# जाहीर लिलाव नोटीस

मौजे गरनरळ, ता.जि. रत्नागिरी येथील श्री.मदन शांताराम कोळंबेकर रा. गडनरळ, ता.जि.रत्नागिरी यांचेकडून तहसिलदार, रत्नागिरी यांना गौणखनिजाच्या उत्खननापोटी 2,27,51,616/- रुपये थकबाकी येणे आहे. तरी, सदर थकबाकीच्या वसुली करीता श्री.मदन शांताराम कोळंबेकर यांच्या मालकी वहिवाटीचा गाव मौजे गडनरळ येथील जमिन मिळकती गट क्र. 748, 750 या जमिन मिळकतीची (मालमत्तेची मा.तहसिलदार यांचे आदेशानुसार लिलावाने विक्री करणेची आहे. सदरचे मिळकतींचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे -

**मालमत्तेचा तपशिल**

| गावाचे नाव | गट नंबर | क्षेत्र (हे.आर. ) | आकार | लिलावाची लघुत्तम किंमत |
|---|---|---|---|---|
| गडनरळ | 748 | 02.30.00 हे.आर. | 0.19 | 2,27,51,616/- |
| गडनरळ | 750 | 2.47.00 हे.आर. | 0.17 | |

वर परिच्छेद क्र. 1 मध्ये नमूद मिळकतींचे लिलावाकरीता निश्चित करणेत आलेली तारीख, वेळ, ठिकाण खालीलप्रमाणे -

| तारिख | वार | वेळ | ठिकाण | प्राधिकृत अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 21/08/2017 | सोमवार | सकाळी 11.00 वाजता | मंडळ अधिकारी कार्यालय जयगड | मंडळ अधिकारी जयगड |

## सदर लिलावाच्या महत्वाच्या अटी खालीलप्रमाणे -

1. **लिलावाची पध्दत** -

सदरचा लिलाव खुल्या पध्दतीने (Open Method) घेतला जाईल. सदर पध्दतीनुसार प्रथम लिलावाची लघुत्तम किंमत (Upset Price) / उच्चतम बोलीची रक्कम लिलाव घेण्यास इच्छुक उपस्थित व्यक्ती / संस्था यांचेसमोर तोंडी स्वरुपात घोषित केली जाईल.लिलाव घेण्यास इच्छुक व्यक्तीने / संस्थेने सदर लिलावाकरीता निश्चित करणेत आलेल्या लघुत्तम किंमत (अपसेट प्राईस) रु.2,27,51,616/- पेक्षा अधिक बोलीने लिलावाला सुरुवात करण्यात येईल.

2. **बयाणा रक्कम** -

सदर लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीने / संस्थेने अनामत रक्कम म्हणून रु. 10,000/- (अक्षरी रु.दहा हजार मात्र) लिलाव करणारे शासकीय प्राधिकृत अधिकारी यांचेकडे रोखीने लिलावाचे दिवशी व लिलावाचे ठिकाणी जमा करावे लागतील. लिलावात भाग घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीला / संस्थेला सदर रक्कम तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी येथे आगावून स्वरुपात भरणा करण्यात येईल. उच्चतम बोलीच्या ¼ (25 टक्के) रक्कम जमा करणे. ज्या व्यक्तीची / संस्थेची उच्चतम बोली निश्चित करण्यात येईल त्या उच्चतम बोलीच्या / देकाराच्या एकूण रकमेच्या ¼ (25 टक्के) रक्कम लिलावाच्या दिवशी शासकीय कार्यालयाच्या कार्यालयीन वेळेमध्ये सायंकाळी 5.30 वाजताचे पूर्वी डिमांड ड्राफ्ट व्दारे अथवा रोखीने, चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ, इंडिया, शाखा रत्नागिरी, खारेघाट रोड, रत्नागिरी मध्ये लिलावाचे दिवशी जमा करुन चलनाची प्रत तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी यांचेकडे जमा करावी लागेल. उर्वरित ¾ रक्कम (75 टक्के) रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आत डिमांड ड्राफ्ट व्दारे कींवा स्टेट बँक ऑफ, इंडिया, शाखा रत्नागिरी, खारेघाट रोड, रत्नागिरी येथील चलनाव्दारे तहसीलदार, रत्नागिरी यांचे कार्यालयत जमा करावी. जर, बोलीच्या/देकाराच्या ¼ (25 टक्के) रक्कम लिलाव धारकाने लिलावाच्याच दिवशी शासन दप्तरी जमा केली नाही तर, सदर लिलावापोटी भरणा केलेली बयाणा रक्कम रु. 10,000/- ही तहसिलदार, रत्नागिरी यांचेमार्फत जप्त करण्यात येईल व त्यांचेमार्फत झालेला लिलाव तत्काळ रद्द करण्यात येईल.

3. **अनामत रकमेचा परतावा** -

ज्या बोलीदाराची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल त्याने आगावू भरणा केलेली अनामत रक्कम  सदर व्यक्तीने / संस्थेने भरावायाच्या बोलीच्या ¼ (25 टक्के) इतक्या रकमेत समायोजित करण्यात येईल.  ज्या बोलीदारांची बोली स्विकारण्यात येणार नाही अशा व्यक्तींच्या / संस्थांच्या कडून स्विकाण्यात आलेल्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर लिलावाच्याच ठिकाणी परत करण्यात येतील.

4. ज्या बोलीदाराची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल त्या व्यक्तीने / संस्थेने स्वत:चा Permanent Account Number ( PAN Number ) व आधार क्रमांक लिलावाच्या ठिकाणी सादर करणे बंधनकारक राहिल.
5. लिलावातील सर्वोच्च बोली स्विकारल्यानंतर व देकाराच्या ¼ रक्कम त्याच दिवशी भरणा केल्यानंतर उर्वरित ¾ रक्कम 15 दिवसांचे आत भरणा करण्यात येईल अशा हमीचे दायित्व स्विकारण्याऱ्या दोन व्यक्तींसह लिलाव धारकाने स्वत: खरेदी केलेल्या रु.100/- इतक्या रक्कमेच्या मुद्रांकित कागदावर (Stamp paper वर ) लिलावाच्या दिनांकापासून 5 दिवसांच्या आत करारनामा / बंधपत्र करुन देणे ही बाब उच्चतम बोली स्विकारण्यावर बंधनकारक राहिल.  सदरचे करारनामा / बंधपत्र तहसिलदार, रत्नागिरी यांना लेखी स्वरुपात करुन द्यावे लागेल.  सदर ¼ रक्कम भरणा केल्यानंतर, उर्वरित ¾ रक्कम लिलावाच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत तहसिलदार, रत्नागिरी यांचेकडे भरणा न केल्यास व त्या कारणाने सदरच्या लिलावाची बोली / लिलाव निष्फळ ठरल्यास लिलावापोटी आगोदर भरणा केलेली ¼ रक्कम तहसिलदार, रत्नागिरी यांचेमार्फत जप्त करण्यात येईल.
6. **लिखित करारनामा** -

ज्या व्यक्तीची / संस्थेची उच्चतम बोली स्विकारण्यात येईल, त्या व्यक्तीकडून / संस्थेकडून लिलावाच्या उच्चतम बोलीची संपूर्ण रक्कम ( 25 टक्के + 75 टक्के =100 टक्के) तहसिलदार, रत्नागिरी यांचेकडे भरणा केल्यानंतर लिलावातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व सदर अटींच्या यथोचित पालनार्थ लिलाव धारकाने स्वखर्चाने खरेदी केलेल्या रु. 200/- इतक्या मुद्रांकित कागदावर (Stamp paper वर) लिलावात घेतलेली मिळकत लिलाव धारकाला ताब्यात देण्यापूर्वी लिलाव धारकाने तहसिलदार, रत्नागिरी यांचेशी लिखित स्वरुपातील करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.

क्र./जबाबी 1/गौ.थ.व/2013-2014

तहसिलदार कार्यालय रत्नागिरी

दिनांक 14/08/2017

सही/---

( मच्छिंद्र सुकटे)

तहसिलदार रत्नागिरी